<u>फिर्याद</u>

जिल्हापेठ पोस्टे.
दि.०१/०७/२०२६.

**मी रेश्मा चद्रंकांत अवतारे, वय ३५ वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कॅम्प जळगाव. मो.नं.९८५०९०६२००.**

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे पोलीस निरीक्षक पदावर नेमणुकीस असुन मागिल ६ महीन्यापासुन ला.प्र.वि. जळगाव येथे कार्यरत आहे.

दि.२४.०६.२०२६ रोजी पोलीस उप अधिक्षक, श्री.योगेश ठाकुर ला.प्र.वि.,जळगाव यांना तक्रारदार देव घनश्यामदास मंधवाणी यांनी फोनद्वारे संपर्क साधुन त्यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेसंबधी तक्रार आहे. तक्रारदार हे दि.२५.०६.२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ला.प्र.वि.कार्यालय जळगाव कार्यालयात येणार आहेत. त्यांची भेट घेवुन त्यांचे तक्रारीप्रमाणे पुढिल कारवाई करण्याचे पोलीस उप अधीक्षक, श्री.योगेश ठाकुर यांनी आम्हास निर्देशित केले होते.

त्याप्रमाणे आम्ही मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, जळगांव व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना गोपनिय कामासाठी प्रत्येकी एक शासकीय कर्मचारी पंच म्हणुन मिळणेबाबत पत्र देवुन श्रीमती कविता रविंद्र पाटील व श्री.सचिन शिरीष विसपुते यांना दि.२५.०६.२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपावेतो ला.प्र.वि.,जळगाव कार्यालयात उपलब्ध करून घेतले.

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार पाहेकॉ/संगिता पवार, पोकॉ/राकेश दुसाने यांना सांगितले की, तक्रारदाराची एका लोकसेवकाविरूध्द लाचेसंबधी तक्रार असुन तक्रारदार हे आज १२.३० वा.चे सुमारास ला.प्र.वि.कार्यालय जळगांव येथे येणार असुन त्यांची तक्रार घेवुन त्यादृष्टीने आपणास लाचेचा सापळा कारवाई करावयाची आहे. त्यानंतर १२.३० वा सुमारास एक इसम हे कार्यालयात हजर झाले. सदर इसमास आम्ही आमचे कार्यालयात बोलावुन दोन्ही पंच व सापळा पथकासमक्ष सदर इसम तक्रारदार असल्याची खात्री करून सापळा पथकासमक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव देव घनश्यामदास मंधवाणी, वय २७ वर्ष, धंदा हॉटेल व्यवसाय, रा.घर नं. १३, नेहरू नगर, जळगाव असे सांगितले. तेव्हा आम्ही त्यांना आमची, पोलीस उपअधिक्षक योगेश ठाकूर यांची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांची ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली. आम्ही तक्रारदार देव मंधवाणी यांना त्यांचे तक्रारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करून त्यांनी कथन केलेली तक्रार पाहता तक्रारदार यांचे वडिलांचे वडीलोपार्जीत जळगाव शहरातील सिंधी कॉलनीमध्ये घर क्र.१०४ असुन त्यांचा सीटी सर्वे नं.४७७४ असा आहे. तक्रारदार यांचे वडील सन २००९ मध्ये मयत झाले आहेत.तक्रारदार यांचे काका हरिष मंधवाणी व अशोक मंधवाणी यांनी वडीलोपार्जीत घराच्या कागदपत्रात फेरफार करून तक्रारदार यांचे वडीलांचे नाव कमी करून सदरचे घर त्यांचे नावावर करून घेतले होते. त्याविरोधात तक्रारदार यांनी जिल्हा अधीक्षक, भुमि अभिलेख, जळगाव येथे अपील केले होते. त्या अपिलांवर सुनावणी होवुन नगर भुमापन विस्तारित क्षेत्रामधील नगर भुमापन क्र. ४७७४ बाबतची फेरफार क्र. २५३६१ दि, २६/०३/२०२१ ची तत्कालिन नगर भुमापन अधिकारी, जळगाव यांनी दि.०७/०४/२०२१ रोजी मंजुर केलेली नोंद रद्द करण्यात येत असल्याबाबतचा आदेश दि. ३०/०४/२०२५ रोजी दिला होता. त्यानंतर नमुद आदेशाप्रमाणे सदरची रद्द झालेली नोंद ७/१२ उता–यावर अदयावत करून मिळणेबाबत तक्रारदार यांनी दि.२५/१२/२०२५ व दि. ०५/०६/२०२६ रोजी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे अर्ज केले असुन कार्यालयाकडुन अदयाप पावेतो कोणतीही कारवाई झालेली नाही.

त्यानंतर तक्रारदार हे दि. १८/०६/२०२६ रोजी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव या कार्यालयात जावुन कार्यालयातील पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पाटील साहेब यांनी तक्रारदार यांना, तुमचे काम मी साहेबांशी बोलुन करून देईन परंतु त्यासाठी तुम्हाला साहेबासाठी १०,०००/– रूपये व मला तुझे इच्छेप्रमाणे पैसे दयावे लागतील असे सांगितले. तेव्हा श्री.पाटील साहेब, भुकरमापक, यांनी तक्रारदार यांचे घर क्र. १०४, सीटी सर्व्हे नं. ४७७४ च्या ७/१२ उता–यावरील वडीलांचे नाव पुर्ववत करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे त्यांचे साहेबासाठी १०,०००/– रूपये लाचेची मागणी करून स्वत:साठी तुझे इच्छेप्रमाणे पैसे देवुन टाक असे सांगुन तक्रारदार यांचेकडे १०,०००/– लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी सापळा पथकासमक्ष तक्रार

Awatre

सांगितली होती. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांची सविस्तर तक्रार दिली होती. त्यावर तक्रारदार देव मंधवाणी, तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री.पाटील,भुकरमापक यांची लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही पुढिल सापळा कारवाई जळगाव शहरातील भाऊचे उदयान येथे जावुन करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे आम्ही, पोलीस उप अधीक्षक श्री.योगेश ठाकूर, दोन्ही पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार पोहेकॉ/संगीता पवार, पोकॉ/राकेश दुसाने यांचेसह सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या साहित्यासह शासकीय वाहन क्र. एम.एच. १९, ई.ए.६०२१ या वरील चालक श्रेपोउनि सुरेश पाटील, नेमणुक–मोटार परिवहन विभाग, जळगांव यांचेसह तसेच तक्रारदार हे त्याचे मेस्ट्रो मोटर सायकलने अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयातुन रवाना होवुन जळगाव शहरातील काव्यरत्नावली चौकात असलेल्या भाऊचे उद्यानाजवळ पोहचलो. सदर ठिकाणी सुरक्षित जागा घेवुन पुढिल कारवाई सुरू केली. त्यानंतर तक्रारदार देव मंधवाणी व पंच क्र. १ कविता पाटील यांना योग्य त्या सुचना दिल्या. आमचे सुचनेप्रमाणे पोकॉ/राकेश दुसाने यांनी नविन सिलबंद मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन, तक्रारदार देव मंधवाणी यांचे शर्टचे आत गळयामध्ये अडकावुन दिले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील यांन तक्रारदार यांचे मेस्ट्रो मोटर सायकलने श्री.पाटील, भुकरमापक यांची भेट घेवुन त्यांचेशी लाचेसंबधी बोलणी करण्यासाठी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे १२.०३ वाजता रवाना केले होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील हे १२.५३ वाजेचे सुमारास सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोलीस अमंलदार राकेश दुसाने यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व तक्रारदार देव मंधवाणी यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी ती कथन केली. त्यानंतर आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व श्री.पाटील, भुकरमापक यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये तक्रारदार यांचे घर क्र. १०४, सीटी सर्व्हे नं. ४७७४ च्या ७/१२ उता–यावरील वडीलांचे नाव पुर्ववत करण्यासाठी प्रलंबित असलेल्या कामाविषयी श्री.पाटील, भुकरमापक यांचे सोबत झालेल्या चर्चेदरम्यान श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार देव मंधवाणी यांना "अभी साहब नही है, इसकी वजहसे नही होंगा, आवो सोमवार मंगलवार आप, पेमेंट वैगरे लेके आणा, देखते है सोमवार को," त्यावेळी तक्रारदार यांनी "कितनी पेमेंट सर," असे विचारले असता श्री पाटील यांनी "उसने बात करना पडेगा, देखेगे, वो क्या बोलते है, उसके हिसाबसे जो भी है, और मेरा जो भी होंगा मुझको दे देना" असे संभाषण झाल्याची खात्री झाली परंतु श्री. पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम किती आणावी याबाबत स्पष्टपणे सांगितले नाही. त्यानंतर काही वेळाने श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना मिस्ड कॉल केला. तेव्हा आम्ही तक्रारदार यांचे मोबाईलवरून श्री.पाटील, भुकरमापक यांना फोन लावण्याचा निर्णय घेवुन तक्रारदार यांनी श्री.पाटील, भुकरमापक यांना फोन केला त्यावेळी श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना पॉप्रर्टी कार्ड घेवुन येणे बाबत सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना प्रॉपर्टी कार्ड घेवुन श्री.पाटील, भुकरमापक यांची भेट घेण्यासाठी पाठविण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर तक्रारदार देव मंधवाणी व पंच क्र. १ कविता पाटील यांना योग्य त्या सुचना देवुन पोकॉ/राकेश दुसाने यांनी आमचे सुचनेवरून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन, तक्रारदार देव मंधवाणी यांचे शर्टचे आत गळयामध्ये अडकावुन दिले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील यांन तक्रारदार यांचे मेस्ट्रो मोटर सायकलने श्री.पाटील साहेब, भुकरमापक यांची भेट घेवुन त्यांचेशी लाचेसंबंधी बोलणी करण्यासाठी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे १५.३७ वाजता रवाना केले होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील हे १६.०० वाजेचे सुमारास सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोकॉ/राकेश दुसाने यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व तक्रारदार देव मंधवाणी यांना घडलेली हकीकत विचारणा करून आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व श्री.पाटील, भुकरमापक यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये तक्रारदार यांचे घर क्र. १०४, सीटी सर्व्हे नं. ४७७४ च्या ७/१२ उता–यावरील वडीलांचे नाव पुर्ववत करण्यासाठी प्रलंबित असलेल्या कामाविषयी श्री.पाटील, भुकरमापक यांचे सोबत झालेल्या चर्चेदरम्यान श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना मै साहब से बात करके आपका काम करके दुंगा, टाईम लगेगा थोडा लेकिन हो जायेंगा असे

Rvathe..

सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी हा ठिक है, दादा असे संभाषण झाल्याची खात्री झाली. श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना सोमवारी बोलविले असल्याने आम्ही पुढिल कारवाई दि.२९/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्याचा निर्णय घेवुन लाच मागणी पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना झालेल्या कारवाईबाबत गोपनियता राखण्याच्या सुचना देवुन घरी जाण्यास सांगितले. व आम्ही दोन्ही पंच व सापळा पथकासह ला.प्र.वि.कार्यालय जळगाव येथे परत येवुन आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार व श्री. पाटील,भुकरमापक यांच्यात झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट तयार करून लाच मागणी पडताळणी स्थगितीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक दि.२९/०६/२०२६ रोजी ११:०५ वाजेच्या सुमारास जळगाव शहरातील भाऊचे उदयानात पोहचुन आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अधिकारी व अमंलदार यांना दिनांक २५/०६/२०२६ रोजी झालेल्या लाचमागणी कारवाईची थोडक्यात हकिकत सांगुन पुढिल सापळा कारवाई सुरू केली.

आम्ही तक्रारदार देव मंधवाणी व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व सापळा पथकातील सदस्यांना लाचमागणी कारवाई संदर्भात योग्य त्या सुचना देवुन श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना मागणी केलेली लाच रक्कम किती आणावी याबाबत स्पष्टता करणे आवश्यक असल्याने आमचे सुचनेवरून पोकॉ/राकेश दुसाने यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तक्रारदार देव मंधवाणी यांचे शर्टाचे आत लावुन देवुन ते सुरु करुन तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील यांना तक्रारदार यांचे मेस्ट्रो मोटर सायकलने श्री.पाटील, भुकरमापक यांची भेट घेवुन त्यांचेशी लाचेसंबंधी बोलणी करण्यासाठी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे १२.५१ वाजता रवाना केले होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील हे १३.२१ वाजेचे सुमारास सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोकॉ/राकेश दुसाने यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व तक्रारदार देव मंधवाणी यांना घडलेली हकीकत विचारणा करून आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व श्री.पाटील, भुकरमापक यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांचे सोबत कामाविषयी चर्चा करून तक्रारदार यांना ''मै आपको साहबसे मिलवाके, साहब क्या खर्चा बोलता आपको दिखता, दोपहर मे आणा पडेंगा'' असे सांगितले असता तक्रारदार यांनी ''दोपेहर में आऊ क्या'' असे संभाषण झाल्याची खात्री झाली.

श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना दुपारी बोलविले असल्याने आम्ही तक्रारदार यांना श्री.पाटील, भुकरमापक यांची भेट घेण्यासाठी पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार देव मंधवाणी व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व सापळा पथकातील सदस्यांना लाचमागणी कारवाई संदर्भात योग्य त्या सुचना देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार देव मंधवाणी यांचे शर्टाचे आत लावुन देवुन तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील यांना तक्रारदार यांचे मेस्ट्रो मोटर सायकलने श्री.पाटील साहेब, भुकरमापक यांची भेट घेवुन त्यांचेशी लाचेसंबधी बोलणी करण्यासाठी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे १५.५३ वाजता रवाना केले होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील हे १७.०७ वाजेचे सुमारास सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर आम्ही पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व तक्रारदार देव मंधवाणी यांना घडलेली हकीकत विचारणाा करून सापळा पथकासमक्ष तक्रारदार व श्री.पाटील, भुकरमापक यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावेळी श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना अभी साहब नही है, कल आके देखो असे संभााषण झाल्याची खात्री झाली.

श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना दिनांक ३०/०६/२०२६ रोजी बोलविले असल्याने आम्ही पुढिल कारवाई दि.३०/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्याचा निर्णय घेवुन लाच मागणी पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना झालेल्या कारवाईबाबत गोपनियता राखण्याच्या सुचना देवुन घरी जाण्यास सांगितले. व आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकासह ला.प्र.वि.कार्यालय जळगाव येथे परत येवुन आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार व श्री.पाटील, भुकरमापक यांच्यात झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट तयार करून लाच मागणी पडताळणी स्थगितीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

Rwathe

दिनांक दि.३०/०६/२०२६ रोजी ११:०५ वा. जळगाव शहरातील भाऊचे उदयानात पोहचुन आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अधिकारी व अमंलदार यांना दिनांक २५/०६/२०२६, दिनांक २९/०६/२०२६ रोजी झालेल्या लाचमागणी कारवाईची थोडक्यात हकिकत सांगुन पुढिल सापळा कारवाई सुरू केली.

आम्ही तक्रारदार देव मंधवाणी व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व सापळा पथकातील सदस्यांना लाचमागणी कारवाई संदर्भात योग्य त्या सुचना देवुन तक्रारदार यांचेकडे श्री.पाटील, भुकरमापक यांनी मागणी केलेली लाच रक्कमेसदर्भात स्पष्टता करणे आवश्यक असल्याने आमचे सुचनेवरून पोकॉ/राकेश दुसाने यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तक्रारदार देव मंधवाणी यांचे शर्टाचे आत लावुन देवुन ते सुरु करुन तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील यांना तक्रारदार यांचे मेस्ट्रो मोटर सायकलने श्री.पाटील, भुकरमापक यांची भेट घेवुन त्यांचेशी लाचेसंबधी बोलणी करण्यासाठी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे १२.३५ वाजता रवाना केले होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील हे १२.५६ वाजेचे सुमारास सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोलीस अमंलदार राकेश दुसाने यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले.

आम्ही पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व तक्रारदार देव मंधवाणी यांना घडलेली हकीकत विचारणा करून आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व श्री.पाटील, भुकरमापक यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना ''चार वाजता'' बोलविले असल्याची खात्री झाली.

श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना चार वाजता बोलविले असल्याने आम्ही तक्रारदार यांना श्री. पाटील, भुकरमापक यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील यांना तक्रारदार यांचे मेस्ट्रो मोटर सायकलने श्री.पाटील, भुकरमापक यांची भेट घेवुन त्यांचेशी लाचेसंबधी बोलणी करण्यासाठी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे १५.२२ वाजता रवाना केले होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील हे १७.२४ वाजेचे सुमारास सापळा पथकाजवळ परत आले. तेव्हा आम्ही पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व तक्रारदार देव मधवाणी यांना घडलेली हकीकत विचारणा करून सापळा पथकासमक्ष तक्रारदार व श्री.पाटील, भुकरमापक यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये श्री.पाटील साहेब, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना ''पधंरा एक दे दो, मुझको पाच दे देना, साहब को दस दे देना, कल आ जाना'' असे बोलुन तक्रारदार यांचे कडे श्री.पाटील, भुकरमापक यांनी साहेबासाठी १० हजार व स्वत:साठी ५ हजार रूपये लाचेची मागणी करून दिनांक ०१/०७/२०२६ रोजी लाच रक्कम घेवुन येणेबाबत सांगितल्याची खात्री झाली.

श्री.पाटील, भुकरमापक यांनी तक्रारदार यांना दिनांक ०१/०७/२०२६ रोजी लाच रक्कम घेवुन बोलविले असल्याने आम्ही पुढिल कारवाई दि.०१/०७/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता करण्याचा निर्णय घेवुन लाच मागणी पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना झालेल्या कारवाईबाबत गोपनियता राखण्याच्या सुचना देवुन घरी जाण्यास सांगितले. व आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकासह ला.प्र.वि. कार्यालय जळगाव येथे परत येवुन आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार व श्री.पाटील,भुकरमापक यांच्यात झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट तयार करून लाच मागणी पडताळणी स्थगितीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक दि.०१/०७/२०२६ रोजी १२.१५ वा.चे सुमारास जळगाव शहरातील भाऊचे उदयानात पोहचुन आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अधिकारी व अमंलदार यांना दिनांक २५/०६/२०२६, दिनांक २९/०६/२०२६ व दिनांक ३०/०६/२०२६ रोजी झालेल्या लाचमागणी कारवाईची थोडक्यात हकिकत सांगुन पुढिल सापळा कारवाई सुरू केली.

त्यानंतर लोकसेवक श्री.पाटील यांनी त्यांचे साहेबांसाठी १०,०००/— रूपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांचे साहेब कोण आहेत याबाबत खात्री करून त्यांची लाच मागणी पडताळणी करणे आवश्यक असल्याने आम्ही लोकसेवक श्री.पाटील यांचे कार्यालयातील साहेबांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार व पंच क्र. १ यांना आवश्यक त्या सुचना देवुन आमचे सुचनेप्रमाणे पोकॉ/राकेश दुसाने यांनी डिजीटल व्हॉईस

Rwatre

रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार देव मंधवाणी यांचे शर्टचे आत लावुन देवुन तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील यांना तक्रारदार यांचे मेस्ट्रो मोटर सायकलने श्री.पाटील साहेब, भुकरमापक यांची व त्यांचे साहेबांची भेट घेवुन त्यांचेशी लाचेसंबधी बोलणी करण्यासाठी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे १३.३० वाजता रवाना केले होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील हे १४.०८ वाजेचे सुमारास सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर आम्ही पंच क्र.१ श्रीमती कविता पाटील व तक्रारदार देव मंधवाणी यांना घडलेली हकीकत विचारणा करून आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व श्री.पाटील, भुकरमापक यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये तक्रारदार यांनी श्री.पाटील साहेब, भुकरमापक यांना ''एक बार मेरी सरसे मुलाकात हो जाती तो अच्छा हो जाता'' असे बोलले असता त्यावर श्री.पाटील, भुकरमापक यांनी ''आप टेन्शन मत लो, बात किया है मेने, वो तुम्हारे सामने नही बोलगें, सामने वाला डाउट लेता है'' असे सांगुन श्री.पाटील यांनी तक्रारदार यांना त्यांचे साहेबांना भेट घालुन देण्यास टाळाटाळ केली. त्यावेळी तक्रारदार यांनी ''ठिक है सर आता हु मै फिर'' असे सांगितल्याची खात्री झाली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार देव मंधवाणी यांना श्री.पाटील,भुकरमापक यांचे मागणीप्रमाणे १५,०००/— रुपये लाच रक्कम देण्यासाठी हजर करण्यास सांगितले. त्यांनी लाच म्हणुन देण्याकरीता त्यांचेकडे असलेले ५००/— रू. दराच्या ३० चलनी नोटा असे एकुण १५,०००/— रुपये आमचे समक्ष हजर केली. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पंच क्र. २ सचिन विसपुते यांनी सदर नोटेचा नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतल्या. त्यावर आम्ही तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या. पोकॉ/मनोज पाटील यांनी सदर लाचेच्या नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले व अ.पा लाचेच्या नोटा तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या पुढील खिशात व्यवस्थित ठेवुन दिल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार देव मंधवाणी व पंच क्र. १ श्रीमती कविता पाटील यांचेसह लाचेची रक्कम घेवुन जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तक्रारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोकॉ/राकेश दुसाने यांनी आमचे सुचनेवरून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तक्रारदार देव मंधवाणी यांचे शर्टचे आत लावुन देवुन त्यांना जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे तक्रारदार यांचे मोटर सायकलने १३.३० वा.रवाना केले व आम्ही सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे मागोमाग शासकीय वाहनाने रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार देव मंधवाणी व पंच क्र. १ श्रीमती कविता पाटील असे सदर जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव येथे पोहचले. त्यानंतर आम्ही जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व श्री.पाटील, भुकरमापक असे जिल्हा अधिक्षक कार्यालयातुन सोबत बाहेर आले व तक्रारदार यांचे मोटार सायकलवर श्री.पाटील, भुकरमापक हे मागे बसुन सोबत कार्यालयाचे परिसराबाहेर जातांना दिसले. त्यानंतर आम्ही व सापळा पथकातील इतर सदस्य असे लागलीच त्यांचे मागे निघालो असता, तक्रारदार व श्री.पाटील हे जिल्हा अधिकारी कार्यालयासमोरील रस्त्याचे पलीकडे असलेल्या गिरणा पाटबंधारे कार्यालय, जळगाव या कार्यालयाचे परिसरातील चहाच्या टपरीवर थांबले. तेथे आम्ही सापळा पथक सुरक्षीत जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी थोडया वेळाने ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास इशारा केला, ती वेळ १६.१८ वाजेची होती. तेव्हा आम्ही सापळा पथकासह सदर ठिकाणी जावुन श्री. पाटील, भुकरमापक यांना लाच रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या श्री.पाटील, भुकरमापक यांस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव जितेंद्र प्रकाश पाटील, वय ४५ वर्ष, व्यवसाय— भुकरमापक, जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव रा.प्लॉट नं. १०२/९ ब,भुषण कॉलनी, जळगाव असे सांगितले.

तरी दिनांक २५/०६/२०२६, दिनांक २९/०६/२०२६, दिनांक ३०/०६/२०२६ व दिनांक ०१/०७/२०२६ रोजी झालेल्या लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान दिनांक ३०/०६/२०२६ रोजी लोकसेवक जितेंद्र प्रकाश पाटील, भुकरमापक, जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जळगाव यांनी तक्रारदार

देव मंधवाणी यांचे घर क्र. १०४, सीटी सर्व्हे नं. ४७७४ च्या ७/१२ उता–यावरील वडीलांचे नाव पुर्ववत करून देण्याचे मोबदल्यात साहेबांच्या नावे १०,०००/– रूपये व स्वत:साठी ५,०००/– रूपये अशी एकुण १५,०००/– रूपये लाच रक्कमची तक्रारदार यांचे कडे मागण करून सदर लाच रक्कम दिनांक ०१/०७/२०२६ रोजी आलोसे यांनी पंचांसमक्ष १६.१८ वाजेच्या सुमारास स्वत: स्विकारली, म्हणुन माझी त्यांचेविरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७ प्रमाणे फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली असता ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष

ही फिर्याद दिली.

दि. ०१/०७/२०२६

(रेश्मा अवतारे)

पोलीस निरीक्षक

ला.प्र.वि.नदुंरबार कॅम्प जळगाव

पोलीस ठाणे अमलदार

शनिपेठ पो.स्टे.जळगांव

पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
जिल्हापेठ पोलीस स्टेशन, जि. जळगाव

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव  **P.S.(ठाणे):** जिल्हापेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0211  **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/07/2026 23:39

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार  **Date From (दिनांक पासून):** 01/07/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/07/2026

**Time From (वेळेपासून):** 16:18 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/07/2026  **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 051

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/07/2026 23:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जळगाव जिल,धिकारी कार्यालयासमोर,असलेल्या गीरणा पाटबंधारे विभाग,रोडवर असलेल्या पानटपरीजवळ सार्

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

FIR

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रेश्मा चंद्रकांत अवतारे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक ACB जळगाव,लाच लुचपत प्रतिबधक विभाग,नंदुरबार कॅम्प जळगाव,जिल्हापेठ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक ACB जळगाव,लाच लुचपत प्रतिबधक विभाग,नंदुरबार कॅम्प जळगाव,जिल्हापेठ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850906200

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जितेंद्र प्रकाश पाटील | | | 1. प्लॉट क्र102 / 9 ब भुषण, कॉलनी जळगाव,जिल्हापेठ, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

भाग 6 गुरन /2026भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम सन 1988 कलम 7, प्रमाणे 1) पोलीस स्टेशन ,गुरनं व कलम जिल्हापेठ पोस्टे जळगाव गुरनं. /2022 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम सन 1988 कलम7,प्रमाणे

2) फिर्यादीचे नांव:- रेश्मा चंद्रकांत अवतारे वय- 35 धंदा - नोकरी(पोलीस निरीक्षक ACB जळगाव) लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नंदुरबार कॅम्प जळगाव,मो.क्र.9850906200
3) आरोपीचे नाव पत्ता - जितेंद्र प्रकाश पाटील वय -45 वर्ष व्यवसाय नोकरी भुकरमापक जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख जळगाव कार्यालय रा.प्लॉट क्र.102 / 9 ब भुषण कॉलनी जळगाव
4) गुन्हा घडला ता.वेळ.व ठिकाण- दि. 01/07/2026 रोजी 16.18 वा.सुमारास जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या गीरणा पाटबंधारे विभागाचे कार्यालयाबाहेर रोडवर असलेल्या पानटपरीजवळ सार्वजनिक जागी.

5) लाचेची मागणी रक्कम 15,000/- रु पैकी 15,000/- रुपये स्विकारले आहे.
8)हस्तगत लाचेची रक्कम 15,000/- रु/- त्यात (500 रू दराच्या 30 चलनी नोटा.
9) सापळा व तपास अधिकारी - श्री योगेश ठाकुर पोलीस निरीक्षक , अँन्टी करप्शन ब्युरो. जळगाव

10) गुन्हयाची थोडक्यात हकीगत यातील मुळ तक्रार दार देवमंधवानी यांचे जळगाव शहरात सिंधी कॉलनीत घर क्र.104 असुन त्याचा सिटी सर्वे नंबर 4774 असा आहे तक्रारदार याचे वडील घनश्याम किसनचंद मंधवानी हे सन 2009 मध्ये मयत झाले असुन तक्रारदार यांच्या काकांनी त्यांचे वडीलोपार्जीत घराच्या कागदपत्रात फेरफार करुन तक्रारदार यांच्या वडीलांचे नाव कमी करुन सदरचे घर स्वताच्या नावावर करुन घेतले होते त्याबाबत तक्रारदार यांनी जिल्हा भुमी अधिक्षक,भुमीअभिलेख कार्यालय जळगाव येथे अपिल दाखल केले होते त्या अपिलावर सुनावणी होउन नगर भुमापन विस्तारीत क्षेत्रातील फेरफार क्र.25361 दि.26/03/2021 अन्वयेची नोंद तत्कालीन भुमापन अधिकारी यांना दि.07/04/2021 रोजी मंजुर केलेली नोंद रद्द केले बाबत दि.30/04/2025 रोजी आदेश दिला होता सदरची रद्द झालेली नोंद 7/12 उता-यावर अद्यावत करुन मिळणेकामी तक्रारदार यांनी दि.25/12/2025 व दि.05/06/2026 रोजी जिल्हा भुमी अधिक्षक,भुमी अभिलेख कार्यालय जळगाव येथे अर्ज केले होते परंतु सदर कार्यालयाकडुन त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता मुळ तक्रार दार हे दि.18/06/2026 रोजी जिल्हा भुमी अधिक्षक,भुमी अभिलेख कार्यालय जळगाव येथे गेले होते तरी सदर कार्यालयातील वर नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांना त्यांचे वडीलांची रद्द झालेली फेरफार नोंद साहेबांशी बोलुन 7/12उता-यावर अद्यावत करुन देतो असे सांगुन तक्रार दार यांचे कडे साहेबांचे नावे 10000/-रु व स्व.ता साठी तक्रारदाराचे ईच्छेप्रमाणे लाचेची मागणी केले बाबत तक्रारदार यांनी दि.25/06/2026 रोजी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती. तक्रारदार यांनी वर प्रमाणे दिलेल्या तक्रारीची दि. 25/06/2026 , दि. 29/06/2026 , दि. 30/06/2026 , दि.01/07/2026 , रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता दि.30/06/2026 आलोसे यांनी तक्रारदार यांचे मयत वडीलांची रद्द झालेली फेरफार नोंद साहेबांशी बोलुन 7/12उता-यावर अद्यावत करुन देतो असे सांगुन तक्रार दार यांचे कडे साहेबांचे नावे 10000/-रु व स्व.ता साठी 5000/-अशी एकुण 15000/- लाच रक्कमेची तक्रारदार यांचेकडे मागणी करुन सदर लाच रक्कम दि.01/07/2026 रोजी आलोसे यांनी स्वता पंचासमक्ष स्वता स्विकारली म्हणुन गुन्हा.

सोबत टंकलिखीत केलेली फिर्याद जोडलेली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

anil lotan wagh(I (Inspector)) / 1977 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): anil lotan wagh
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 1977

पोलीस ठाणे अंमलदार
जिल्हापेठ पो.स्टे.जळगांव

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**